2/049

63

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0029 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/01/2023 15:47

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 12/01/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/01/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:31 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/01/2023 **Time (वेळ):** 15:35 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/01/2023 15:37 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ममता स्विट लाडगाव रोड वैजापुर ,वैजापुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** पदमसिंग उर्फ सुनिल ओंकारसिंग ठ

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रघुनाथ नगर, तागंगापुर, जिऔरं,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रघुनाथ नगर, तागंगापुर, जिऔरं,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामेश्वर सिताराम काळे | | | 1. नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 25/01/2023

मी पदमसिंग उर्फ सुनिल ओंकारसिंग ठाकुर, वय 52 वर्शे, धंदा-व्यवसाय व षेती, रा. रघुनाथ नगर, ता.गंगापुर, जि.औरंगाबाद .
समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर राहणेस आहे. मी दि. 12/01/2023 रोजी वैजापुर, जि. औरंगाबाद येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहुन पोलीस उपअधीक्षक श्री.खेडकर, ला.प्र.वि.अहमदनगर यांना दोन पंचासमक्ष लाचमागणीची तक्रार सांगितली होती की, '' माझा भाऊ देविसिंग ओंकारसिंग ठाकुर यांच्या नावे नेवरगाव, ता.गंगापुर येथे शासनमान्य देषी दारूचे दुकान आहे. त्याचे काम देखील मी पाहतो. दि.18/12/2022 रोजी वैजापुर तालुक्यतील पिंपळगाव येथे देषी दारूचे 12 बॉक्सची डिलीवरी देण्यासाठी माझ्या मालकीची चारचाकी सुमो गाडी क्र. एम एच 20 डीव्ही 0535 या वाहनाने 1) श्री.आण्णासाहेब नानासाहेब शिंदे , ड्रायव्हर 2) श्री. अतुल संजीव षेजवळ हे दोघे 12 बॉक्स घेवुन जात असताना पिंपळगाव-नेवरगाव रोडवर उपविभागीय पोलीस अधिकारी वैजापुर यांच्या वाहनावरील वाहन चालक श्री. रामेश्वर काळे यांनी माझ्या वाहनचालकाला अडविले व गाडी चेक करून देशी दारू विनापरवाना वाहतुक केल्यामुळे माझ्या गाडीवरील वाहन चालक श्री. शिंदे, श्री.शेजवळ व माझ्यावर विरगाव पोलीस स्टेशन येथे दि. 18/12/2022 रोजी गुन्हा दाखल केला. त्यानंतर दि. 20/12/2022 रोजी श्री. काळे पोलीस यांनी मला उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, वैजापुर येथे फोन कॉल करून बोलवुन घेतले. मी त्या ठिकाणी गेल्यानंतर श्री. काळे मला म्हणाले की, तुमच्या देशी दारूच्या दुकानातुन विनापरवाना वाहतुक केली म्हणुन गुन्हा दाखल केला आहे. त्यामध्ये तुम्ही सुध्दा आरोपी आहात, त्यामुळे तुमच्या देशी दारू दुकानाचा परवाना रद्द होवु शकतो. जर तुमचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वैजापुर येथुन पाठवायचा नसेल तर त्यासाठी तुम्ही मला 50,000/-रुपये दया. असे म्हणुन काळे पोलीस हे माझेकडे लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार सांगितली. माझी तक्रार मी सांगितले प्रमाणे लिहिण्यात आली. ती मला वाचुन दाखविली. ती बरोबर असल्याची खात्री करून त्या तक्रारीवर मी, पो.उप अधी.श्री.खेडकर व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे लोकसेवक काळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.
त्यानंतर पो.उपअधी.श्री.खेडकर यांनी मला व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकॉर्डरचे वापराबाबत माहिती देवून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस उपअधी.श्री. खेडकर यांनी व्हॉईस रेका◌ॅर्डर चालु करून त्यांनी स्वतः, दोन्ही पंचांनी व मी निवेदन केले. पो.उपअधी.श्री.खेडकर यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर बंद केले. त्यानंतर काळे पोलीस हे कोठे आहेत हे विचारण्यासाठी माझे मोबाईलवरून मी त्यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी मला 'त्यादिवषी चहा घेतला त्या चहाच्या हा◌ॅटेलमध्ये या' असे सांगितले. आमचे फोनवरील संभाशण पो.उपअधी.श्री.खेडकर यांनी रेका◌ॅर्डरमध्ये रेका◌ॅर्ड केले.
पो. उपअधी.श्री. खेडकर यांनी मला व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेका◌ॅर्डर सुरु करून तो माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना काळे पोलीस यांची◌ भेट घेण्यासाठी 13/55 वा. माझेकडील चारचाकी वाहनातुन रवाना केले. मी व पंच नं. 1 असे रवाना होवुन काळे पोलीस यांनी बोलविलेल्या चहाचे हा◌ॅटेल येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी काळे पोलीस यांना फोन केला. तेव्हा त्यांनी मला वैजापुर-लाडगाव रोडवरील ममता स्विट येथे येण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 असे ममता स्विट येथे गेलो. तेथे माझेत व काळे पोलीस यांचेत बराच वेळ चर्चा झाली. काळे पोलीस यांनी माझेकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम ममता स्विटचे मालक असलेले खाजगी इसम यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन पो.उप अधी.श्री खेडकर व सापळा पथक थांबले त्या

ठिकाणी परत आलो. ती वेळ 15/31 वाजताची होती. तेथे पो.उपअधी.श्री खेडकर यांनी माझेकडील व्हाईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. मला व पंच नं.1 यांना काळे पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केले परत येई पर्यंतची हकीकत विचारली. मी व पंच यांनी काळे पोलस यांनी माझ्याकडे 30,000/-रुपयांची मागणी केल्याचे सांगितले. तसेच त्यानंतर पो.उपअधी. श्री.खेडकर यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेका◌ॅर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. लोकसेवक काळे यांनी माझेकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम ममता स्विटचे मालक असलेले खाजगी इसम यांचेकडे देण्यास सांगितल्याने ममता स्विटचे मालक यांचेविरूध्द ममता स्विट येथे जावुन लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. मी लाच म्हणुन देण्यात येणारी 30,000/-रुपये रक्कम हजर केली. षासकिय वाहनात अ◌ॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या वापराबाबत पो.उपअधी.श्री. खेडकर यांनी माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक सापळा पथकातील पोना चैधरी यांना करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या 500/-रुपये दराच्या 60 नोटांना दोन्ही बाजुंनी अ◌ॅन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटांचे बंडल माझे षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिल्या. त्यानंतर ममता स्विटचे मालक असलेले खाजगी इसम यांचेविरुध्द ममता स्विट येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. पो.उपअधी.श्री. खेडकर यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी अषांना सापळा कारवाईदरम्यान करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना समजावुन सांगितल्या.

त्यानंतर व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना माझे चारचाकी वाहनातुन 16/43 वा. रवाना केले. त्याप्रमाणे रवाना होवुन आम्ही वैजापुर-लाडगाव रोडवरील ममता स्विट येथे गेलो. आमच्या पाठोपाठ पो.उपअधी.श्री खेडकर, सापळा पथक असे येवुन ममता स्विट चे आजुबाजुस कोणाला संषय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबले. मी ममता स्विटचे मालक यांचे फोनवरून काळे पोलीस यांना फोन करून ममता स्विटचे मालक यांचेकडे पैसे देवु का असे विचारले असता लोकसेवक काळे यांनी नको मी आलो घ्यायला असे सांगितले.परंतु बराच वेळ झाला तरीही काळे पोलीस हे पैसे स्विकारण्यासाठी आले नाहीत. त्यानंतर मी त्यांना माझे मोबाईलवरून तीन-चार वेळा फोन केले त्यावेळी देखील काळे पोलीस यांनी मी येतो आहे असे सांगुन ते आलेच नाहीत. त्यामुळे मी व पंच नं. 1 असे आम्हास रवाना केले त्याठिकाणी येवुन थांबलो. पाठोपाठ पो.उपअधी.श्री. खेडकर व सापळा पथक आले. तेथे आल्यानंतर मी माझ्या फोनवरून काळे पोलीस यांना दोन वेळा फोन केला. त्यात काळे पोलीस यांनी त्यांना उदया डयुटी आहे, दुपारनंतर निवांत झाल्यानंतर का◌ॅल करा असे सांगितले. त्यामुळे काळे यांचेविरूध्द काळे पोलीस व माझ्यात फोनवरून बोलणे झाल्यानंतर पुढील कार्यवाही कधी करावयाची ते ठरविण्यात येईल असे ठरले. त्यानंतर पो.उपअधी.श्री. खेडकर यांनी मला सुचना दिली की, काळे पोलीस व माझ्यात फोनवर बोलणे झाले व त्यांनी मला बोलविल्यानंतर तात्काळ त्यांचेषी संपर्क करणेबाबत व सदर कारवाई बाबत गोपनियता बाळगावी. अषा सुचना देवुन मला जाण्यास मोकळीक दिली.

त्यानंतर दि.16/01/2023 रोजी लोकसेवक काळे पोलीस यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्यासाठी पो. उपअधी.श्री. खेडकर, दोन्ही पंच व सापळा पथक असे वैजापुर-गंगापुर रोडवरील सुरक्षित ठिकाणी आले.पो.उपअधी. श्री. खेडकर यांनी मला षासकिय वाहनात बसण्यास सांगितले. षासकिय वाहनात लाच म्हणुन देण्यात येणाÚया नोटांच्या काही तपासण्या करण्यात आल्या.पो.उपअधी.श्री.खेडकर यांचे सुचनेप्रमाणे मी काळे पोलीस हे कोठे आहेत असे विचारण्यासाठी त्यांना फोन लावुन ते कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी हा◌ॅस्पिटलमध्ये आहे असे सं◌ागितले. मी त्यांना ''तुम्ही त्या दिवषी सांगितल्याप्रमाणे 30,000/-रुपये घेवुन आलो आहे, कुठे येवु असे विचारले असता काळे पोलीस यांनी कधीचे पैसे, मी सांगितलेच नाहीना, मी कषाला सांगितले तुम्हाला पैसे, काही पण बोलु नका सेठ'' असे म्हणुन लाचेची रक्कम घेवुन येण्याबाबत नकार दिला.

एकंदरित काळे पोलीस यांना माझेबाबत काही संषय आला असावा म्हणुन त्यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला असावा. तसेच यापुढे देखील काळे हे माझ्याकडुन लाच स्विकारणार नाहीत यांची मला खात्री झाली आहे असे मी पो.उपअधी.श्री. खेडकर यांना दोन्ही पंचासमक्ष सांगुन सदरची सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करुन पुढील कायदेषीर कार्यवाही करावी असे म्हणालो. त्याप्रमाणे पो.उपअधी.श्री. खेडकर यांनी माझा तसा जबाब नोंदवुन घेतला.

आज रोजी पो.उप अधी.श्री.खेडकर यांनी माझेषी संपर्क केले प्रमाणे मी वैजापुर येथे हजर झालो. तेथे त्यांनी दि. 12/01/2023 रोजी लोकसेवक काळे यांनी माझेकडे माझे देषी दारूच्या दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी वैजापुर यांच्या कार्यालयातुन पुढे जावु न देण्याच्या मोबदल्यात 30,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे सांगुन मला लोकसेवक काळे यांचेविरुध्द फिर्याद देणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी फिर्याद देत आहे.

तरी मी दि.12/01/2023 रोजी नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुशंगाने करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान 13/55 ते 15/31 वा. दरम्यान लोकसेवक रामेष्वर काळे यांनी माझेकडे माझे भावाचे नावे असलेला देषी दारूच्या दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी वैजापुर यांच्या कार्यालयातुन पुढे जावु न देण्याच्या मोबदल्यात 30,000/-रुपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची संमती दर्षविली असल्याने माझी लोकसेवक रामेष्वर सिताराम काळे, पोलीस अंमलदार, ब.नं.452, नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी, वैजापुर यांचे वाहनावरील वाहन चालक यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली

( पदमसिंग ओंकारसिंग ठाकुर )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

वैजापूर

**District** (जिल्हा): औरंगाबाद ग्रामीण

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Samratsing Vijaysing
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अमलदार
पो स्टे वैजापूर